Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# यवतमाळ जिल्ह्यातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या उद्योजकता विकास, आर्थिक सक्षमीकरण,रोजगार निर्मिती व वित्तीय समावेशनावर होणारा बहुआयामी परिणाम : एक विश्लेषनात्मक अध्ययन

**डॉ.रवींद्र बी. टेंभुर्णे**
प्राध्यापक
एस.पी.एम. सायन्स आणि गिलाणी कला
वाणिज्य महाविद्यालय घाटंजी

**महादेव देविदास बुर्रेवार**
संशोधक
एस. पी. एम. सायन्स आणि गिलाणी कला
वाणिज्य महाविद्यालय घाटंजी

## प्रस्तावना :

प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) ही भारत सरकारने 2015 मध्ये सुरू केली. सूक्ष्म व लघु उद्योजकांना कर्जपुरवठा करणारी महत्वपूर्ण योजना आहे. या योजनेद्वारे शिशु, किशोर आणि लघु आणि तरुण या तीन श्रेणीमध्ये विनातारण कर्ज उपलब्ध करून स्वयंरोजगार , उद्योजकता आणि आर्थिक विकासाला चालना दिली. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश यवतमाळ जिल्ह्यातील लाभार्थी यांवर या योजनेचा उद्योजकता विकास ,आर्थिक सक्षमीकरण, रोजगार निर्मिती आणि वित्तीय समावेशनाच्यादृष्टीने झालेल्या परिणामाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा आहे. मुद्रा योजने अंतर्गत शिशु (रु 50000) किशोर (रु50000 ते रु 5लाख) आणि तरुण (रु5 लाख ते रु10लाख) तसेच सुधारित मर्यादेनुसार पात्र प्रकरणामध्ये अधिक रक्कम आशा श्रेणीमध्ये कर्ज दिले जाते योजनेचा उद्देश केवळ कर्जपुरवठा नसून स्वावलंबी उद्योजक निर्माण करणे, रोजगार वाढविणे आणि वित्तीय समावेशन मजबूत करणे हा आहे.कृषिप्रधान असलेल्या यवतमाळ जिल्ह्यात रोजगाराच्या मर्यादित संधी लक्षात घेता मुद्रा योजनेचा स्थानिक उद्योजकतेवर झालेला परिणाम अभ्यासणे आवश्यक ठरते.

## गोषवारा

"यवतमाळ जिल्ह्यातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या उद्योजकता विकास , आर्थिक समावेशन, रोजगार निर्मिती व वित्तीय समावेशनावर होणार बहुआयामी परिणाम : एक विश्लेषणात्मक अध्ययन " या संशोधनाचा मुख्य उद्देश यवतमाळ जिल्ह्यात प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या माध्यमातून झालेल्या सामाजिक , आर्थिक आणि उद्योजकतीय परिवर्तनाचा अभ्यास करणे हा आहे.

## संशोधन पद्धती :

या प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. वर्णनात्मक संशोधनाद्वारे प्रधानमंत्री मुद्रा योजनेची उद्दिष्टे,अंमलबजावणी , लाभार्थी यांची वैशिष्टे आणि योजनेची सद्यस्थिती यांचे वर्णन करण्यात येईल. विश्लेषणात्मक संशोधनाद्वारे योजनेमुळे उद्योजकता विकास , आर्थिक सक्षमीकरण,रोजगार निर्मिती आणि वित्तीय समावेशनावर झालेल्या परिणामाचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात येईल.

## संशोधनाची उद्दिष्टे :

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**यवतमाळ जिल्ह्यातील प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.**

यवतमाळ जिल्ह्यात प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) प्रत्यक्षात किती प्रभावीपणे राबविण्यात आली आहे, तिची अंमलबजावणी कोणत्या पद्धतीने झाली, लाभार्थ्यांना कर्ज मिळविताना कोणत्या अडचणी आल्या, तसेच या योजनेमुळे स्वयंरोजगार, सूक्ष्म उद्योग आणि आर्थिक विकासावर काय परिणाम झाला याचा सखोल अभ्यास करणे. या अभ्यासामध्ये शिशु, किशोर आणि तरुण या मुद्रा कर्ज श्रेणींचा लाभ, बँकांची भूमिका, कर्ज वितरणाची प्रक्रिया, लाभार्थ्यांचे समाधान, कर्जाचा व्यवसायावर झालेला परिणाम आणि योजनेच्या अंमलबजावणीतील अडथळे यांचे विश्लेषण केले जाते. जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी कोणत्या स्वरूपात झाली आहे. विवध बॅंका व वित्तीय संस्थांमार्फत किती लाभार्थ्यांना कर्ज वितरित करण्यात आले आहे. आणि योजनेचा विस्तार कितपत झाला आहे,यांचा अभ्यास करणे.

**उद्योजकता विकासावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करणे.**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे यवतमाळ जिल्ह्यात उद्योजकतेच्या विकासावर कोणते सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम झाले आहेत, याचे सखोल विश्लेषण करणे. या अभ्यासामध्ये लाभार्थ्यांनी कर्जाचा उपयोग नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी, विद्यमान व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी किंवा रोजगारनिर्मितीसाठी कितपत केला याचा अभ्यास केला जातो. मुद्रा योजनेमुळे नवीन उद्योग,व्यवसाय सुरू होण्यास, विद्यमान उद्योगांचा विस्तार होण्यास आणि स्वयं रोजगाराच्या संधी वाढण्यास कितपत मदत झाली आहे. याचे मूल्यांकन करणे.

**लाभार्थ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणावर योजनेचा झालेला प्रभाव तपासणे :**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणावर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास करणे. आर्थिक सक्षमीकरण म्हणजे व्यक्तीची उत्पन्न मिळविण्याची क्षमता वाढणे, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे, बचतीची सवय निर्माण होणे, कर्ज फेडण्याची क्षमता वाढणे आणि स्वतःचे आर्थिक निर्णय स्वतंत्रपणे घेण्याची क्षमता विकसित होणे.लाभार्थ्यांच्या उत्पन्नात,बचतीत,गुंतवणुकीत, आणि आर्थिक स्वावलंबनात आणि कुटुंबांच्या स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

**रोजगार निर्मितीमध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे योगदान तपासणे :**

या अभ्यासामध्ये मुद्रा कर्जाचा लाभ घेतलेल्या व्यक्तींनी नवीन उद्योग किंवा व्यवसाय सुरू केला का, विद्यमान व्यवसायाचा विस्तार केला का आणि त्या मुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात किती रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या, याचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरेल.प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे निर्माण झालेल्या स्वयं रोजगारआणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधीचे विश्लेषण जरून स्थानिक बेरोजगारी कमी करण्यातील योजनेची भूमिका स्पष्ट करणे.

**महिला, युवकआणि ग्रामीण उदयोजकांच्या विकासामध्ये मुद्रा योजनेची भूमिका अभ्यासणे:**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील महिला, युवक आणि ग्रामीण उद्योजकांच्या आर्थिक व उद्योजकीय विकासात कितपत योगदान मिळाले आहे, याचा सखोल अभ्यास करणे. या अभ्यासामध्ये लाभार्थ्यांना मुद्रा कर्जाच्या माध्यमातून नवीन उद्योग-व्यवसाय सुरू करण्याची, विद्यमान व्यवसायाचा विस्तार करण्याची आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याची कितपत संधी मिळाली, याचे विश्लेषण केले जाईल.

तसेच या उद्दिष्टाअंतर्गत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, युवकांमध्ये उद्योजकतेची वाढ, ग्रामीण भागातील सूक्ष्म उद्योगांचा विकास, उत्पन्नातील वाढ, रोजगारनिर्मिती, व्यवसायाची शाश्वतता आणि जीवनमानातील सुधारणा यांचे मूल्यांकन केले जाईल.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संशोधनाचे महत्व :

### उद्योजकता विकासाचे मूल्यमापन :

उद्योजकांची संख्या, व्यवसायाची टिकाऊपणा, व्यवसायातील गुंतवणूक, उत्पादन व विक्रीतील वाढ, नफ्यातील वाढ, रोजगारनिर्मिती, नाविन्यपूर्ण उपक्रमांचा अवलंब, बाजारपेठेतील विस्तार आणि स्पर्धात्मक क्षमता या बाबींचे मूल्यमापन केले जाते. तसेच महिला, युवक, ग्रामीण उद्योजक आणि सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये उद्योजकतेला मिळालेली चालना याचाही अभ्यास केला जातो. प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे यवतमाळ जिल्ह्यात नव उद्योजकांची संख्या, व्यवसायाची वाढ आणि स्वयं रोजगाराच्या संधी कितपत वाढल्या यांचे वस्तुनिष्ट मूल्यमापन करता येते. व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले वित्तीय सहाय्य उद्योजकांना कितपत प्रभावीपणे मिळाले आहे याचे विश्लेषण करता येईल.

### आर्थिक सक्षमीकरणाचे विश्लेषण :

आर्थिक सक्षमीकरण म्हणजे व्यक्तींची उत्पन्न मिळविण्याची क्षमता वाढणे, आर्थिक स्वावलंबन प्राप्त होणे,नियमित बचत करणे,आर्थिक निर्णय स्वतंत्रपणे घेण्याची क्षमता विकसित होणे. मुद्रा योजनेचा लाभ घेतल्यानंतर लाभार्थ्यांच्या उत्पन्नात ,बचतीत,गुंतवणुकीत ,आर्थिक स्वावलंबनात आणि जीवनमानात झालेल्या बदलांचा अभ्यास या संशोधनातून करता येईल. कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा आणि आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास योजनेचे योगदान स्पष्ट होईल.

### रोजगार निर्मितीतील योगदानाचा अभ्यास :

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे यवतमाळ जिल्ह्यात रोजगार निर्मितीमध्ये कितपत योगदान मिळाले आहे, याचा सखोल आणि विशेषणात्मक अभ्यास करणे महत्वाचे आहे. संशोधनातून मुद्रा योजनेमुळे निर्माण झालेल्या स्वयं रोजगाराच्या आणि इतर रोजगाराच्या संधीचे मूल्यांकन करता येईल. नवीन उदयोगांमुळे स्थानिक युवक,महिला आणि इतर कामगारांना रोजर मिळाला का,तसेच बेरोजगारी कमी करण्यास या योजनेचे कितपत मदत झाली हे समजून घेण्यास मदत होईल.

### वित्तीय समावेशनाला चालना:

समाजातील प्रत्येक व्यक्तीला, विशेषतः ग्रामीण, अल्प उत्पन्न गट, महिला, युवक आणि वंचित घटकांना औपचारिक बँकिंग व वित्तीय सेवांचा सहज, परवडणारा आणि सुरक्षित लाभ उपलब्ध करून देणे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या संदर्भात या मुद्द्याचे महत्त्व असे आहे की, ही योजना तारणाशिवाय सूक्ष्म व लघुउद्योजकांना कर्ज उपलब्ध करून देते. त्यामुळे अनेक नागरिक प्रथमच बँकिंग व्यवस्थेशी जोडले जातात. यामुळे बचत खाते, कर्ज, डिजिटल व्यवहार, विमा आणि इतर वित्तीय सेवांचा वापर वाढतो. परिणामी आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता विकास आणि शाश्वत आर्थिक प्रगतीला चालना मिळते.

### यवतमाळ जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी :

यवतमाळ जिल्हा हा प्रामुख्याने कृषीप्रधान जिल्हा असून येथे ग्रामीण लोकसंख्या, सूक्ष्म उद्योग आणि स्वयंरोजगाराचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. अशा परिस्थितीत प्रधानमंत्री मुद्रा योजना स्थानिक उद्योजकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देण्याची महत्त्वाची भूमिका बजावते.

या संशोधनाद्वारे मुद्रा योजनेमुळे नवीन उद्योग-व्यवसायांची स्थापना, स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये वाढ, स्थानिक रोजगारनिर्मिती, कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ, आर्थिक स्वावलंबन आणि जीवनमानातील सुधारणा कितपत झाली, याचे मूल्यांकन करता येईल. तसेच महिला, युवक, ग्रामीण व वंचित घटकांच्या आर्थिक सहभागात झालेली वाढ आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर झालेला परिणामही स्पष्ट होईल

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## शाश्वत ग्रामीण विकासाला चालना :

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे ग्रामीण भागातील सूक्ष्म व लघुउद्योजकांना तारणाशिवाय कर्ज उपलब्ध होत असल्याने स्वयंरोजगार, लघुउद्योग आणि स्थानिक उद्योजकतेला चालना मिळते. यामुळे ग्रामीण भागात उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतात, रोजगाराच्या संधी वाढतात आणि आर्थिक स्वावलंबनाला बळकटी मिळते. यवतमाळ जिल्ह्याच्या संदर्भात या संशोधनाद्वारे मुद्रा योजनेमुळे ग्रामीण उद्योजकता, कृषीपूरक व्यवसाय, महिला बचत गट, सेवा क्षेत्र आणि सूक्ष्म उद्योगांच्या विकासात कितपत वाढ झाली, तसेच ग्रामीण लोकांच्या जीवनमानात, उत्पन्नात आणि आर्थिक स्थैर्यात किती सुधारणा झाली, याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येईल.

## निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की प्रधानमंत्री मुद्रा योजना हा यवतमाळ जिल्ह्यात उद्योजकता विकास, आर्थिक सक्षमीकरण, रोजगार निर्मिती आणि वित्तीय समावेशनाला चालना देणारी एक महत्वपूर्ण योजना ठरली आहे. या योजनेमुळे अनेक युवक, महिला, शेतकरी आणि लघु उद्योजकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची तसेच विद्यमान व्यवसायाचा विस्तार करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे स्वयं रोजगाराला प्रोत्साहन मिळून स्थानिक स्तरांवर रोजगारनिर्मितीमध्ये वाढ झालेली दिसून येते. यवतमाळ जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टीने प्रधानमंत्री मुद्रा योजना ही प्रभावी आणि उपयुक्त योजना असून तिची अधिक परिणामकारक अंमलबजावणी केल्यास उद्योजकता विकास व वित्तीय समावेशन या क्षेत्रामध्ये अधिक व्यापक सहाय्य करता येतील.

## संदर्भ :

भारत सरकार वित्त मंत्रालय,Pradhanmantri Mudra Yojana – Annual Report

भारतीय रिजर्व बँक (RBI) Reports on Trend and Progress of Banking in India.

यवतमाळ जिल्हा सांख्यिकीय कार्यालय - जिल्हा सामाजिक व आर्थिक आढावा

National Bank of Agriculture and Rural Development (2023). Status of Microfinance in India 2022-2023

भारत सरकार – प्रधानमंत्री मुद्रा योजना अधिकृत

District Industries Centre (DIC), Yavatmal. District Industrial Profile, विविध वर्षे.

State Level Bankers' Committee (SLBC), Maharashtra. Annual Credit Plan & PMMY Progress Reports, विविध वर्षे.

Micro Units Development and Refinance Agency (MUDRA) Ltd.. Annual Report, विविध वर्षे.

Government of Maharashtra. Economic Survey of Maharashtra, विविध वर्षे.